# नवी मुंबई महानगरपालिका

## जाहीर आवाहन

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने नवी मुंबई शहरातील तमाम नागरीकांना जाहीर आवाहन करण्यात येत आहे की, महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये विविध ठिकाणी विकासकांमार्फत बांधकामे करण्यात येत आहेत. अशा सर्व विकासकांनी नवी मंबई महानगरपालिकेचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. तथापी काही विकासक नवी मुंबई महानगरपालिकेची बांधकाम परवानगी न घेता सिडको / एम.आय.डी.सी. किंवा खाजगी जागेवर अनधिकृत बांधकाम / अतिक्रमण करून इमारती उभारत असतात.

तरी अशा अनधिकृत इमारतीमध्ये सदनिका / गाळे खरेदी केल्यास व भविष्यात त्या अनुषंगाने अनधिकृत बांधकामावर सिडको / एम.आय.डी.सी. / नवी मुंबई महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून निष्कासनाची कारवाई झाल्यास अनधिकृत इमारतीमध्ये सदनिका / गाळे खरेदी करणाऱ्या नागरीकांस आर्थिक / मानसीक त्रास व नुकसान होऊ शकेल. सबब सर्व गरजू नागरीकांनी / खरेदीदारांनी बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र व भोगवटा प्रमाणपत्र असल्याची खात्री करूनच खरेदी व्यवहार करावेत अन्यथा फसविले गेल्यास महानगरपालिका त्यास जबाबदार राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**सही /-**
**उप आयुक्त (अतिक्रमण)**
**नवी मुंबई महानगरपालिका**